**ठळक बातम्या**

- ओला दुष्काळ जाहीर करणं नियमात बसत नसल्याचं मुख्यमंत्र्यांचं स्पष्टीकरण, तरीही दुष्काळाच्या सवलती लागू करण्याचं आश्वासन

- राज्याचा उस गाळप हंगाम १ नोव्हेंबरपासून, ३ हजार ५५० रुपये एफआरपी निश्चित

- नैऋत्य मौसमी पावसाचा राज्यातला परतीचा प्रवास येत्या काही दिवसात सुरू होणार

- औद्योगिक, वाणिज्यिक आणि इतर वर्गवारीतल्या ग्राहकांकडून वीज वापरावर अतिरिक्त वीज विक्री कर आकारायला मंत्रिमंडळाची मंजुरी

**आणि**

- महिला विश्वचषक स्पर्धेला आजपासून सुरुवात, नाणेफेक जिंकून श्रीलंकेकडून भारताला फलंदाजीला पाचारण

**<><><><><>**

राज्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर ओला दुष्काळ जाहीर करणं नियमात बसत नाही, मात्र दुष्काळासाठी ज्या सवलती लागू केल्या जातात तशाच सवलती लागू केल्या जातील, असं मुख्यमंत्री देवेंद्र फ़डनवीस यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत मंत्रिमंडळ बैठकीनंतर वार्ताहरांशी बोलत होते.

- **- होल्ड बाईट मुख्यमंत्री - -**

राज्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा आढावा मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. पुढच्या दोन तीन दिवसांत नुकसानीची सर्व माहिती राज्य सरकारला मिळेल, त्यानंतर मदतीची घोषणा पुढच्या आठवड्यात करू, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. केंद्र सरकारकडे नुकसानीचा अहवाल पाठवला जाईल, मात्र दिल्लीच्या मदतीची वाट न पाहता राज्य सरकार आपदग्रस्तांची मदत करेल, असं त्यांनी स्पष्ट केलं. अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर वसुली न करण्याचे निर्देश बँकांना दिल्याचंही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं.

राज्यातल्या ३३ जिल्ह्यांना अतिवृष्टीचा जास्त फटका बसला आहे. प्राथमिक अंदाजानुसार सव्वा ते दीड कोटी एकर क्षेत्राचं नुकसान झालं आहे. पंचनामे करण्याचं काम

युद्धपातळीवर सुरू असून पंचनामा पूर्ण झालेल्या ठिकाणी शेतकऱ्यांना सव्वा २ हजार कोटी रुपयांची मदत आतापर्यंत दिली आहे, अशी माहिती कृषीमंत्री दत्तात्रय भरणे दिली.

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी कृषीविभागाचे अधिकारी आणि कर्मचारी १ दिवसाचं वेतन मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये मदत देणार आहेत. यातून ६ कोटी रुपयांहून अधिक निधी जमा होईल, असं ते म्हणाले.

<><><><>

राज्यात अतिवृष्टी झाल्यामुळे यंदाचा ऊस गाळप हंगाम १ नोव्हेंबरपासून सुरु करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या मंत्रीमंडळ समितीच्या बैठकीत घेण्यात आला. तसंच मुख्यमंत्री सहायता निधीसाठी प्रतिटन १० रुपये आणि पूरग्रस्तांच्या मदतीसाठी प्रतिटन ५ रुपये कपात करण्याचा निर्णयही या बैठकीत झाला. यंदा गाळप होणाऱ्या उसासाठी प्रति मेट्रिक टन ३ हजार ५५० रुपये एफआरपी तर बेसिक उताऱ्यासाठी अतिरीक्त रक्कम दिली जाणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. गेल्या हंगामात सुमारे २०० साखर कारखान्यांनी गाळप घेतले असून यामध्ये ९९ सहकारी आणि १०१ खाजगी कारखान्यांचा समावेश होता. शेतकऱ्यांना ३१ हजार ३०१ कोटी रुपयांची एफआरपी अदा करण्यात आली आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले.

<><><><>

देशातल्या ऊस लागवडीशी संबंधित आव्हानांवर उपाय शोधण्यासाठी भारतीय कृषी संशोधन परिषदेअंतर्गत एक विशेष पथक स्थापन केलं जाईल, असं केंद्रीय कृषी आणि ग्राम विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी घोषित केलं आहे. ते आज नवी दिल्लीत शाश्वत ऊस अर्थव्यवस्थेवरच्या राष्ट्रीय सल्लामसलत बैठकीला दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून संबोधित करत होते. हे पथक, शेतकरी, वैज्ञानिक आणि कृषी क्षेत्राशी संबंधित लाभधारकांच्या सूचनांना अनुसरून, ऊस उत्पादन धोरण आणि संशोधन विषयक दिशानिर्देश तयार करेल, असं ते यावेळी म्हणाले.

<><><><>

राज्यात अनेक ठिकाणी पाऊस ओसरला असून पाणी पातळी नियंत्रित करण्यासाठी विविध धरणांमधून विसर्ग करण्यात येत आहे. पाण्याच्या विसर्गामुळे नद्यांच्या पातळीतली वाढ लक्षात घेऊन छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, जालना, बीड, परभणी, सोलापूर,

नांदेड आणि गडचिरोली जिल्ह्यात मदत आणि बचाव कार्यासाठी पथकं तैनात करण्यात आली आहे, अशी माहिती राज्य आपत्कालीन कार्य केंद्राने दिली आहे. यासंदर्भात अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...

***- - पाऊस व्हाइस कास्ट - -***

*(नाशिक जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून झालेल्या पावसामुळे तब्बल २ लाख ४७ हजार हेक्टर पेक्षा अधिक क्षेत्र बाधित झालं आहे. अतिवृष्टीमुळे कांदा, द्राक्षबाग, फुलशेती तसेच भातशेतीचं मोठं नुकसान झालं आहे.*

*धुळे जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे शेतीसह घरांचं मोठं नुकसान झालं आहे. त्या नुकसानीचे पंचनामे तातडीनं पूर्ण करून आर्थिक मदत द्यावी या मागणीसाठी जिल्ह्यातल्या विविध संघटनांनी आज आंदोलन केलं. जळगाव जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या आर्थिक नुकसानाची भरपाई करण्याची मागणी करत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केलं.*

*धाराशिव जिल्ह्यात लोहारा तालुक्यात मौजे नागुर इथं पुराच्या पाण्यात वाहून गेलेल्या बालाजी व्यंकट मोरे या शेतकऱ्याच्या कुटुंबाला जिल्हा प्रशासनानं ४ लाख रुपयांची आर्थिक मदत केली आहे. अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत म्हणून धाराशिव जिल्ह्यातल्या उमरगा तालुक्यातल्या माऊली प्रतिष्ठाननं मुख्यमंत्री सहाय्यता निधीला १ लाख १ हजार १११ रुपये दिले आहेत.)*

**<><><><><>**

नैऋत्य मौसमी पावसाचा राज्यातल्या परतीचा प्रवास येत्या काही दिवसात सुरू होईल. हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार आजपर्यंत गुजरातच्या बहुतांश भागातून हा पाऊस परतला आहे. त्यानंतर ५ ऑक्टोबरपर्यंत उत्तर महाराष्ट्रातून तर १० ऑक्टोबरपर्यंत राज्याच्या बहुतांश भागातून मान्सून परत जाईल. ऑक्टोबरच्या मध्यापर्यंत संपूर्ण देशातून मान्सून माघारीचा प्रवास प्रवास पूर्ण होईल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

येत्या दोन दिवसांत कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी, मराठवाड्यात काही ठिकाणी, तर विदर्भात बऱ्याच ठिकाणी पाऊस पडेल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**<><><><><>**

औद्योगिक, वाणिज्यिक आणि इतर वर्गवारीतल्या ग्राहकांकडून वीज वापरावर अतिरिक्त वीज विक्री कर आकारायला आज मंत्रिमंडळानं मंजुरी दिली. सध्या प्रत्येक युनीटमागे सुमारे ११ पैसे वसूल केले जात होते. त्यात दर युनिटमागे सुमारे १० पैसे इतकी वाढ होणार असल्यानं हा कर २१ पैसे होईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय झाला. राज्यातल्या वीज कंपन्यांनी विक्री केलेल्या विजेवर हा अतिरिक्त विक्री कर लागू केला जाईल. यातून प्रधानमंत्री कुसुम घटक-ब योजनेकरता निधी मिळवता येईल, आणि राज्यातल्या कृषि पंपाना पुरेशी वीज उपलब्ध झाल्यानं शेतकऱ्यांना दिवसा सिंचन करता येईल.

राज्यात कर्करोगग्रस्तांना दर्जेदार उपचार उपलब्ध व्हावेत यासाठी सर्वसमावेशक कर्करोग सेवा धोरण निश्चित करण्यात आलं आहे. यासाठी महाकेअर अर्थात महाराष्ट्र कॅन्सर केअर, रिसर्च अँड एज्युकेशन फाऊंडेशन ही कंपनी स्थापन केली जाणार आहे. या माध्यमातून राज्यभरात १८ रुग्णालयांमधे कर्करोगाशी निगडीत विशेषोपचार उपलब्ध करून दिले जातील. यामुळे राज्यात कर्करोगाशी संबंधित डे-केअर केंद्रांच्या संख्येत मोठी वाढ होणार आहे.

महाराष्ट्र जागतिक क्षमता केंद्र धोरण २०२५ ला मंत्रिमंडळानं आज मंजुरी दिली. या धोरणामुळे राज्यात ५० हजार ६०० कोटी रुपयांची गुंतवणूक, आणि त्यातून सुमारे चार लाख रोजगार निर्मिती अपेक्षित आहे. या धोरणाचा कालावधी २०२५ ते २०३० असा राहणार आहे. राज्यात सध्या ४०० जागतिक क्षमता केंद्रे असून त्यामधून सुमारे ४ लाख लोकांना रोजगार मिळालेला आहे. या धोरण कालावधीत आणखी ४०० नवीन जागतिक क्षमता केंद्रे स्थापन करणे, चार लाख कुशल रोजगार निर्मिती करणे, नाशिक, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर या सारख्या शहरामध्ये जागतिक क्षमता केंद्रांचा विस्तार करणं ही या धोरणाची मुख्य वैशिष्ट्ये आहेत.

राज्याच्या विकासाला आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञानाची जोड देऊन एकात्मिक आणि नियोजनबद्ध गती देण्यासाठी महाजिओटेक महामंडळ स्थापन करायलाही मंत्रिमंडळानं मंजुरी दिली.

**<><><><><>**

सर्पदंशावर हाफकिन संस्थेनं तयार केलेली लस प्रभावी आणि परिणामकारक असून सध्या हाफकिनकडे या लशीच्या दीड लाख मात्रा तयार आहेत, त्यांची खरेदी महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणानं करावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज दिले. त्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळाच्या प्रश्नांसंदर्भात आयोजित बैठकीत ते बोलत होते.

केंद्र सरकारकडून पोलिओ लशीच्या २६ कोटी ८० लाख मात्रांची मागणी आहे. या लशीची निर्मिती करण्यासाठी हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळाला हाफकिन खरेदी कक्षाच्या दोन टक्के उपकारातून २५ कोटी रुपयांचा निधी द्यायला या बैठकीत तत्वतः मान्यता देण्यात आली.

**<><><><><>**

सेवा पर्व या विशेष मालिकेत आज ऐकुया ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला यांचा अंतराळातल्या ऐतिहासिक प्रवासाविषयी....

**कॅप्सूल**

*(देशातल्या अंतराळ संशोधन क्षेत्रात अनेक महत्त्वाकांक्षी उपक्रम सुरू आहेत. त्याचाच एक भाग म्हणजे ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला यांचा अंतराळ स्थानकावरचा प्रवास. शुक्ला हे आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर पोहोचणारे पहिले भारतीय अंतराळवीर ठरले आहेत. या यशाचं कौतुक प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारताच्या मानवी अंतराळमोहिमेचं पहिलं पाऊल असं केलं आहे.*

- ***- होल्ड बाईट - प्रधानमंत्री --***

*शुक्ला आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अंतराळात विविध प्रयोग केले. भविष्यातल्या अंतराळ मोहिमांसाठी त्यांच्या संशोधनाचे निष्कर्ष उपयोगाचे ठरणार आहेत. भारताच्या आगामी अंतराळ मोहिमेबद्दल शुभांशु शुक्ला म्हणाले*

- ***- होल्ड - शुभाशुं शुक्ला बाइट - -***

*शुभांशू शुक्लांचा अंतराळ प्रवास भारताच्या भविष्यातल्या मानवी अंतराळ मोहिमा, चांद्र मोहिमा, भारतीय अंतराळ स्थानक यासारख्या मोहिमांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.)*

**<><><><><>**

'सेवापर्व २०२५ विकसित भारत के रंग, कला के संग' या उपक्रमांतर्गत आज मुंबईत एकदिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. गेट वे ऑफ इंडिया इथं झालेल्या या कार्यशाळेत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळेतले साडेसातशे विद्यार्थी तसंच जे जे कला महाविद्यालयाचे विद्यार्थी सहभागी झाले.

<><><><><>

मुंबईत मालाड इथल्या महानगरपालिकेच्या 'मनोहर देसाई' रुग्णालयात आज 'स्वस्थ नारी सशक्त परिवार' योजने अंतर्गत महिला आणि बालकांसाठी आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आलं होतं. या शिबिरात गर्भवती महिलांची आणि लहान मुलांची तपासणी आणि लसीकरण करण्यात आलं. तसंच आहारतज्ज्ञांनी  मार्गदर्शन केलं.

याउपक्रमा अंतर्गत हिंगोली जिल्ह्यात विविध ठिकाणी आरोग्य शिबिरं आयोजित करण्यात आली आहेत. कळमनुरी तालुक्यात आखाडा बाळापूर इथल्या ग्रामीण रुग्णालयात आज ५३० महिला आणि ६० बालकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. वसमत, औंढा, कळमनुरी इथलं उपजिल्हा रुग्णालय, महिला रुग्णालय, आणि ग्रामीण रुग्णालयातही हा उपक्रम राबवण्यात आला.

<><><><><>

आयसीसी महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेला आज सुरुवात झाली. या स्पर्धेतला पहिला सामना गुवाहाटी इथं भारत आणि श्रीलंका यांच्यात सुरू आहे. श्रीलंकेनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. भारताची सुरुवात खराब झाली. स्मृती मंधाना ८ धावा काढून बाद झाली. भारताच्या, १० षटकात १ बाद ४३ धावा झाल्या असताना मैदान ओलं असल्यानं खेळ थांबवावा लागला होता.

पुन्हा खेळ सुरू झाल्यावरही भारतीय संघाचा डाव उभारी घेऊ शकला नाही. प्रतिका रावल ३७, हरलीन देओल ४८ धावांवर बाद झाली. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारतीय संघाच्या ३९ षटकात ६ बाद २०४ धावा झाल्या होत्या.

भारत आणि श्रीलंका या देशांसह ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, न्यूझीलंड, दक्षिण अफ्रिका, बांग्लादेश आणि पाकिस्तानच्या महिला संघांमध्ये प्राथमिक फेरीचे २८ सामने होतील.

<><><><><>

रत्नागिरी जिल्ह्यातल्या पंचायत समिती सभापतीपदासाठीची आरक्षण सोडत आज काढण्यात आली. दापोली पंचायत समिती सभापतीपद इतर मागासवर्ग, राजापूर पंचायत समिती सभापतीपद इतर मागासवर्ग महिलेसाठी आरक्षित ठेवण्यात आलं आहे. मंडणगड, संगमेश्वर, लांजा, आणि खेड पंचायत समिती सभापतीपद महिलेसाठी आरक्षित आहे.

**<><><><><>**

आज आंतरराष्ट्रीय अनुवाद दिवस साजरा होत आहे. विविध देशांमध्ये बोलल्या जाणाऱ्या भाषा अनुवादित करणाऱ्या भाषातज्ज्ञांच्या कामाविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. भाषांतरकार हे भाषा आणि पर्यायाने विविध संस्कृतीला जोडणाऱ्या पुलांचं काम करतात असं प्रतिपादन अनुवादासाठी साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखिका सोनाली नवांगुळ यांनी आकाशवाणीशी बोलताना केलं…

- **- होल्ड.. बाईट - सोनाली नवांगुळ** - -

- **<><><><><>**

पुढच्या वर्षी होणाऱ्या विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी प्रदेश काँग्रेसनं समन्वयकांची नियुक्ती केली आहे.

पुणे पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघासाठी बाळासाहेब थोरात,  यांची समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. नागपूर पदवीधर मतदार संघासाठी सतेज उर्फ बंटी पाटील, छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदारसंघासाठी डॉ. सुनिल देशमुख, तर अमरावती शिक्षक मतदारसंघासाठी एम. एम. शेख यांची नियुक्ती केली असल्याचं महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीनं कळवलं आहे.

**<><><><><>**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात मुंबई-गोवा महामार्गावर आज कार आणि  दुचाकीच्या अपघातात एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाला. तर दोघे जण जखमी झाले आहेत. यामुळे संतप्त झालेल्या मृताच्या नातेवाईकांनी मृतदेह महामार्गावर ठेवून आंदोलन केलं. त्यामुळे मुंबईकडे जाणारी वाहतूक काही काळासाठी ठप्प झाली होती.

**//<><><><><>//**